मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील पात्र दिव्यांग कर्मचाऱ्यांना निवडश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती देणेबाबत.
(अतिरिक्त निवडसूची वर्ष- सन २०२१-२२)

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

**शासन आदेश क्रमांक : एएससी १५२५/प्र.क्र.१५/प्रशा-३,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**तारीख: २३ फेब्रुवारी, २०२६**

**वाचा :-** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०२२/प्र.क्र.८३/१६-अ, दि.२९.०७.२०२४.

**आदेश**

संदर्भीय शासन निर्णय दि.२९.०७.२०२४ नुसार दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना गट ड ते गट-अ च्या निम्नस्तरापर्यंतच्या पदांमध्ये पदोन्नतीमध्ये ४ टक्के या प्रमाणात आरक्षण दि.३०.०६.२०१६ पासून लागू करण्यात आले आहे. दिव्यांग आरक्षणानुसार सन २०२१-२२ वर्षाच्या अतिरिक्त निवडसूचीमधून पात्र ठरलेल्या खालील उच्चश्रेणी लघुलेखक यांना निवडश्रेणी लघुलेखक पदावर या आदेशाद्वारे विहित अटींच्या अधिनतेने रकाना क्र. ४ मध्ये नमूद दिनांकास नियमित पदोन्नती देण्यात येत असून संबंधित निवडश्रेणी लघुलेखकांकरीता रकाना क्र. ५ मध्ये नमूद कालावधीकरीता अधिसंख्य पद निर्माण करण्यात येत आहे. तसेच सदर उच्चश्रेणी लघुलेखक यांची पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर रकाना क्र.-७ मध्ये दर्शविलेल्या विभागामध्ये करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अतिरिक्त निवडसूची वर्ष | उच्चश्रेणी लघुलेखकाचे नाव व विभाग | नियमित पदोन्नतीचा दिनांक | निवडश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नतीनंतर अधिसंख्य पदाचा कालावधी | सध्याचा विभाग | निवडश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती नंतरचा विभाग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | सन २०२१-२२ | श्री.प्र.वि.नेरपगारे (इं) (दिव्यांग-अस्थिव्यंग) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | दि.०५.०९.२०२२ | दि .०५.०९.२०२२ ते वरिष्ठ स्वीय सहायक पदावर पदोन्नती होईपर्यंत | उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | जलसंपदा विभाग |

२. सदर उच्चश्रेणी लघुलेखकांची निवडश्रेणी लघुलेखक पदावरील पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

१) सदर उच्चश्रेणी लघुलेखक यांची निवडश्रेणी लघुलेखक पदावरील पदोन्नती ही त्यांच्याविरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे. संबंधित विभागाने याची खातरजमा करावी.

२) सदर पदोन्नती मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणाऱ्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

३) संदर्भाधीन दि.२९.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार दि.३०.०६.२०१६ पासून ज्या दिनांकाला सबंधित दिव्यांग अधिकारी/कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र ठरला आहे त्या दिनांकापासून त्यांना काल्पनिक रित्या पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ देण्यात आला आहे. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नतीचा प्रत्यक्षात आर्थिक लाभ त्यांनी प्रत्यक्षात पदभार स्वीकारल्याच्या तारखेपासून लागू होईल.

४) निवडश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती दिलेल्या श्रीनेरपगारे.वि.प्र., उच्चश्रेणी लघुलेखक यांनी हे आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांमध्ये निवडश्रेणी लघुलेखक पदाचा कार्यभार स्वीकारणे आवश्यक आहे. श्रीनेरपगारे.वि.प्र. उच्चश्रेणी लघुलेखक यांना जलसंपदा विभागातील निवडश्रेणी लघुलेखक या पदावर रुजू होण्यासाठी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने विहित मुदतीत कार्यमुक्त करावे.

३. महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणातील तरतूदीनुसार पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण घेणे संबंधित पदोन्नत कर्मचाऱ्यांवर बंधनकारक राहील अन्यथा संबंधित निवडश्रेणी लघुलेखकांस उच्चश्रेणी लघुलेखक पदावर पदावनत करण्यात येईल.

४. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने श्री. नेरपगारे, उच्चश्रेणी लघुलेखक यांना कार्यमुक्त केल्याचे तसेच जलसंपदा विभागाने श्री. नेरपगारे, उच्चश्रेणी लघुलेखक यांना निवडश्रेणी लघुलखक या पदावर रुजू करुन घेतल्याच्या आदेशाच्या प्रती या विभागास पाठवाव्यात.

५. सदर शासन आदेश वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ/क्र.३०/आपुक, दि.२९.०१.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२२३१८२५००७८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

AKSHATA KAMOSH DESAI

Digitally signed by AKSHATA KAMOSH DESAI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=59a95eb36d13ce00c8c8d9fda89857cd27a7e7709afd65d3a808b2e470f6e2d5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1E6B65A66BF0CB664DFEDA36F9154BCDD9D89AAA98B88B5A2EA5CD4774355699, cn=AKSHATA KAMOSH DESAI
Date: 2026.02.23 18:26:07 +05'30'

**( अक्षता देसाई )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

श्री.प्र.वि.नेरपगारे, उच्चश्रेणी लघुलेखक ( उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागामार्फत)

**प्रत,**

१. अ.मु.स./प्र.स./सचिव, संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
२. सह/उप सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
३. निवडनस्ती (कार्यासन- प्रशा-३)